# पुणे विद्यापीठ

## - शासनमान्य शिक्षकेतर पदांसाठी जाहिरात -

(विस्तृत जाहिरात संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)

पुणे विद्यापीठ कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी / शिक्षकेतर सेवकांची खालील शासनमान्य रिक्त पदे सरळ सेवेने भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात **सोमवार, दिनांक २० मे, २०१३ पर्यंत ऑन लाईन (Online)** अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील ऑन लाईन (Online) भरावयाचा अर्ज पुणे विद्यापीठाच्या **http://recruitment.unipune.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**टिप :-** यापूर्वी विद्यापीठाकडून प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार केलेले सर्व पदांसाठीचे अर्ज रद्द करण्यात आलेले आहेत.

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा गट | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १. | उप वित्त व लेखा अधिकारी<br>वेतन बँड : रु.१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन : रु.७६००<br><br>(धारणाधिकार कालावधीसाठी ऑगस्ट, २०१६ पर्यंत)<br><br>(सदरचे पद हे फक्त धारणाधिकार कालावधीसाठी अथवा सदरचा प्रशासकीय अधिकारी रुजू होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिताच भरण्यात येईल.) | अ | ०१ | खुला - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी किमान 'ब' श्रेणीसह उत्तीर्ण आणि पदवी परीक्षेत कॉस्ट अकांऊटींग अथवा ॲडव्हान्स अकांऊटींग आणि ऑडिटींग विषय घेऊन पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>सहायक वित्त अधिकारी अथवा समकक्ष पदाचा वेतन बँड रू.९३००-३४८००, ग्रेड वेतन रू.५४०० मधील किमान तीन वर्षांचा वित्तीय कामकाजाचा अनुभव.<br>**अथवा**<br>चार्टर्ड अकांऊटंट आणि संबंधित कामाचा तीन वर्षाचा अनुभव.<br>२. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| २. | उपकुलसचिव<br>वेतन बँड : रु.१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन : रु.६६०० | अ | ०७ | खुला - ४<br>(पैकी १ महिला)<br>विजा (अ)- १<br>इमाव - १<br>विमाप्र - १<br><br>(उपरोक्त सर्व पदांपैकी अंध/अल्पदृष्टी - १) | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी किमान 'ब' श्रेणीसह उत्तीर्ण.<br>२. सहायक कुलसचिव अथवा समकक्षपदाचा वेतन बँड रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन रु.५४००/- मधील किमान तीन वर्षांचा प्रशासकीय कामाचा अनुभव.<br>**अथवा**<br>विद्यापीठ/ वरिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील पूर्णवेळ मान्यताप्राप्त शिक्षक म्हणून अध्यापनाचा रू. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रू.६०००/- मधील किमान पाच शैक्षणिक वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा गट | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| ३. | अंतर्गत हिशोब तपासनीस<br>वेतन बँड : रु.१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन : रु.६६०० | अ | ०१ | खुला - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी किमान 'ब' श्रेणीसह उत्तीर्ण आणि पदवी परीक्षेत कॉस्ट अकांऊटींग अथवा ॲडव्हान्स अकांऊटींग आणि ऑडिटींग विषय घेऊन पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>सहायक वित्त अधिकारी अथवा समकक्ष पदाचा वेतन बँड रू.९३००-३४८०० ग्रेड वेतन रू.५४०० मधील किमान तीन वर्षांचा लेखा परीक्षण विषयक कामकाजाचा अनुभव.<br>**अथवा**<br>चार्टर्ड अकांऊटंट आणि संबंधित कामाचा तीन वर्षाचा अनुभव.<br>२. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ४. | जनसंपर्क अधिकारी<br>वेतन बँड : रु.१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन : रु.६६०० | अ | ०१ | खुला - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची मास कम्युनिकेशन / जर्नालिझम / पब्लिक रिलेशन या विषयातील पदव्युत्तर पदवी किमान 'ब' श्रेणीसह उत्तीर्ण.<br>२. प्रसारमाध्यमांमधील संबंधित कामाचा तीन वर्ष अनुभव.<br>**अथवा**<br>जनसंपर्क अधिकारी पदाचा रू.९३००-३४८०० ग्रेड वेतन रू.५४०० या वेतनश्रेणीमधील किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>३. मराठी, इंग्रजी व हिंदी या भाषांवर प्रभुत्व आणि लेखन कौशल्य आवश्यक.<br>४. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ५. | सहायक कुलसचिव<br>वेतन बँड : रु.१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन : रु.५४०० | अ | १४ | खुला - ७<br>(पैकी २ महिला)<br>अनु.जाती - २<br>भज (ब) - १<br>इमाव - ३<br>विमाप्र - १<br><br>(उपरोक्त सर्व पदांपैकी अंध/अल्पदृष्टी - १) | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी किमान 'ब' श्रेणीसह उत्तीर्ण.<br>२. कक्षाधिकारी (सर्वसाधारण) अथवा समकक्ष पदावरील वेतन बँड रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन रु.४४००/- मधील किमान तीन वर्षांचा प्रशासकीय कामाचा अनुभव.<br>**अथवा**<br>विद्यापीठ / वरिष्ठ / कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील पूर्ण वेळ मान्यताप्राप्त शिक्षक म्हणून अध्यापनाचा किमान रू.९३००-३४८००, ग्रेड वेतन रू.४४०० या वेतनश्रेणीतील किमान पाच वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा गट | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| ६. | सहायक वित्त अधिकारी<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.५४०० | अ | ०१ | खुला - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी किमान 'ब' श्रेणीसह उत्तीर्ण आणि पदवी परीक्षेत कॉस्ट अकांऊटींग अथवा ॲडव्हान्स अकांऊटींग आणि ऑडिटींग विषय घेऊन परीक्षा उत्तीर्ण.<br>कक्षाधिकारी (लेखा) अथवा समकक्ष पदावरील वेतन बँड रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन रु.४४००/- मधील तीन वर्षांचा वित्तीय कामकाजाचा अनुभव.<br>**अथवा**<br>चार्टर्ड अकाऊन्टंट आणि संबंधित कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव.<br>२. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ७. | प्रोग्रॅमर<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.५४०० | अ | ०८ | खुला ४<br>(पैकी १ महिला)<br>अनु.जाती १<br>विजा(अ) १<br>इमाव - २<br>(उपरोक्त सर्व पदांपैकी अंध/अल्पदृष्टी - १) | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.एस्सी.(कॉम्प्युटर सायन्स) / एम.सी.एस. /एम.सी.ए.(विज्ञान) / अभियांत्रिकी पदवी (बी.ई) (कॉम्प्युटर / इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) किमान 'ब' श्रेणीसह उत्तीर्ण.<br>२ शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील प्रकल्प/ लिनक्स सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेशन /वेब डिझायनिंग/ डेव्हलपमेंट यामधील व तत्सम कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव. |
| ८. | आरोग्य अधिकारी<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.५४०० | अ | ०१ | खुला - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यक विद्याशाखेतील एम.बी.बी.एस. पदवी परीक्षा किमान 'ब' श्रेणीसह उत्तीर्ण.<br>२. इंटर्नशिप पूर्ण केल्यानंतर वैद्यकीय व्यवसायाचा किमान पाच वर्षांचा अनुभव.<br>३. स्त्री रोग तज्ज्ञास प्राधान्य<br>४. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>५. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ९. | उप अभियंता (विद्युत)<br>वेतन बँड रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन रू.५४०० | अ | ०१ | खुला - १ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी पदवी परीक्षा किमान 'ब' श्रेणीसह उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय संस्थेमध्ये संबंधित क्षेत्रात काम केल्याचा किमान पाच वर्षांचा अनुभव, आणि सब स्टेशन, उच्चदाब विद्युत वाहिनी, जनरेटर, दूरध्वनी यंत्रणा, वातानुकूलित यंत्रे, निवासी व अनिवासी इमारती यांचे विद्युत परिक्षण व नवीन इमारतींचे स्वतंत्रपणे विद्युत भार संकल्पन तसेच प्रत्यक्ष काम करवून घेण्याची क्षमता असणे आवश्यक.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा गट | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १०. | कर्मशाळा अधिक्षक<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | ब | ०१ | खुला - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी (मेकॅनिकल/ईलेक्ट्रिकल) पदवी परीक्षा किमान 'ब' श्रेणीसह उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय संस्थेमधील मॅकेनिकल आणि इलेक्ट्रोमॅकेनिकल संशोधन सामुग्री, मशिन टूल आणि डाय डिझाईन, एस.पी.एम. आणि उपकरणे डिझाईन, ड्रॉईंग, मॅन्युफॅक्चरिंग, फॅब्रिकेशन, मेन्टनेंसमधील किमान तीन वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ११. | सहायक अभियंता (विद्युत)<br><br>वेतन बँड रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन रू.४४००/- | ब | ०१ | खुला - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी पदवी परीक्षा किमान 'ब' श्रेणीसह उत्तीर्ण. अथवा विद्युत अभियांत्रिकी पदविका किमान प्रथम श्रेणी अथवा किमान 'अ' श्रेणी मध्ये उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक / औद्योगिक /शासकीय संस्थेमधील संबंधित क्षेत्रातील कामाचा तसेच दैनंदिन कामाचे पर्यवेक्षण, पत्रव्यवहार व करारनामे, अंदाजपत्रके तयार करण्याचा पदवीधारकांसाठी किमान तीन वर्षे व पदविकाधारकांसाठी पाच वर्षे अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| १२. | कक्षाधिकारी (सर्वसाधारण)<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | ब | २० | खुला - १०<br>(पैकी २ महिला )<br>अनु.जाती - ३<br>अनु.जमाती - १<br>भ.ज.(ब) - १<br>भ.ज.(क) - १<br>इमाव - ४<br>(पैकी १ महिला )<br><br>(उपरोक्त सर्व पदांपैकी अस्थिव्यंग - १) | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किमान 'ब' श्रेणीसह उत्तीर्ण.<br>२. सहायक कक्षाधिकारी (सर्वसाधारण) अथवा समकक्ष पदावरील वेतन बँड रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन रु.४३००/- यामधील किमान तीन वर्षांचा प्रशासकीय कामाचा अनुभव किंवा शासकीय सेवेतील अथवा शासनमान्य शैक्षणिक संस्थेतील गट 'क' मधील किमान ६ वर्षाचा कार्यालयीन/प्रशासकीय कामकाजाचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| १३. | कक्षाधिकारी (लेखा)<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | ब | ०६ | खुला - ३<br>भज (ब) - १<br>विमाप्र - १<br>इमाव - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.कॉम. पदवी किमान 'ब' श्रेणीसह उत्तीर्ण.<br>२. सहायक कक्षाधिकारी (लेखा) अथवा समकक्ष पदावरील वेतन बँड रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन रु.४३००/- मधील तीन वर्षांचा वित्तीय (लेखा) कामाचा अनुभव किंवा शासकीय सेवेतील अथवा शासनमान्य शैक्षणिक संस्थेतील लेखा विभागातील गट 'क' मधील किमान ६ वर्षाचा वित्तीय कामकाजाचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

## सर्वसाधारण सूचना

- **ऑनलाईन अर्ज करण्याच्या महत्वाच्या तारखा :**

१. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचा कालावधी : मंगळवार, दिनांक ३०/०४/२०१३ ते सोमवार, दिनांक २०/०५/२०१३ पर्यंत.
२. ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज **(Hard Copy)** स्विकारण्याची अंतिम मुदत : सोमवार, दिनांक २७/०५/२०१३ पर्यंत.(कार्यालयीन वेळेत)
३. अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर (कार्यालयीन वेळेनंतर) प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
४. सध्याच्या नियोक्त्यामार्फत सादर केलेले अर्ज **(Hard Copy)** सुध्दा सोमवार, दिनांक २७/०५/२०१३ पर्यंत (कार्यालयीन वेळेत) विद्यापीठ कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे.

- **ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत :**

१. उमेदवाराने वृत्तपत्रातील व विद्यापीठ संकेतस्थळावरील जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.
२. उमेदवाराने अर्ज **(Hard Copy)** विद्यापीठ कार्यालयात सादर करतांना शैक्षणिक कागदपत्रे व अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.
३. उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना अर्जाच्या शुल्काचा धनाकर्ष (डी.डी.) काढलेला असावा.
४. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना सर्वप्रथम संकेतस्थळावर जाऊन स्वतःची नोंदणी (Create Account) करावयाचे आहे.
५. संकेतस्थळावर स्वतःची नोंदणी करतांना उमेदवाराने त्याची वैयक्तिक माहिती अचूकरित्या भरुन युजर नेम व पासवर्ड तयार करावा.
६. Login मध्ये युजर नेम व पासवर्ड टाकल्यावर अर्जदाराने **वैयक्तिक, प्रवर्ग (आरक्षण), शैक्षणिक आणि अनुभवासंदर्भातील माहिती** अचूकरित्या दिलेल्या क्रमाने भरावी.
७. **"अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा"** या शीर्षकावर जाण्यापूर्वी अर्जदाराने वैयक्तिक, प्रवर्ग (आरक्षण), शैक्षणिक आणि अनुभवासंदर्भातील माहिती बरोबर असल्याची खात्री करावी. त्यानंतर उमेदवारास वरील माहितीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.
८. **"अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा"** या शीर्षकावर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने त्यास ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदासंदर्भातील व धनाकर्षाची (डी.डी.) माहिती भरल्यानंतर **Apply** करावे. तद्नंतरच अर्ज भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर अर्जाची प्रिंटआऊट काढावी.
९. अर्जाची प्रिंट आऊट घेऊन स्वाक्षरीसह एक प्रत, नजिकच्या काळातील पासपोर्ट आकाराचे स्वतःचे छायाचित्र अर्जावर चिकटवून व छायाचित्र साक्षांकित करुन अर्जाच्या शुल्कासह, लिफाफ्यावर ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्याचा स्पष्ट उल्लेख करुन कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ४११ ००७ या पत्यावर समक्ष अथवा पोस्टाने अंतिम दिनांकापर्यत कार्यालयीन वेळेत जमा करावेत.(सोबत छायाचित्र असलेल्या ओळखपत्राची साक्षांकित प्रत जोडावी. उदा.आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, पारपत्र**(Passport)**)
१०. ऑनलाईन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकानंतर जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या पदांकरिता अर्ज **(Apply)** करता येणार नाही.
११. वरील पदांकरिता फक्त पुणे विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

- **अर्ज शुल्क :**

१. खुल्या गटातील उमेदवारांसाठी रु. ४००/- (अक्षरी रुपये चारशे फक्त)

२. मागासवर्गीय उमेदवारांसाठी (सर्व प्रवर्गातील) रु.२००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त)

३. अर्जाच्या शुल्काचा धनाकर्ष (डी.डी.) हा "कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे" (Registrar, University of Pune) यांचे नांवे राष्ट्रीयकृत बँकेचाच असणे आवश्यक आहे.

४. सदर अर्जाचे शुल्क हे ना परतावा राहील.

- **वयोमर्यादाः**

१. अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास वयोमर्यादा गणली जाईल.

२. गट 'अ' मधील पदासाठी किमान ३० वर्षे आणि कमाल ४० वर्षे. तथापि, 'प्रोग्रॅमर' या पदासाठी किमान २५ वर्षे आणि कमाल ३५ वर्षे.
(मागासवर्गीय उमेदवारांना कमाल वयामध्ये पाच वर्षे शिथीलक्षम)

३. गट 'ब' मधील पदासाठी किमान २५ वर्षे आणि कमाल ३५ वर्षे.
(मागासवर्गीय उमेदवारांना कमाल वयामध्ये पाच वर्षे शिथीलक्षम)

४. सर्व मान्यताप्राप्त विद्यापीठे आणि अशा विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था तसेच शासकीय / निमशासकीय कार्यालयांमध्ये कार्यरत सेवकांसाठी उच्चतम वयोमर्यादेची अट लागू नाही.

५. खुला तसेच राखीव प्रवर्गातील अपंग उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादेची अट वयाच्या ४५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील.

६. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ३० एप्रिल, २००५ च्या शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ मधील तरतूदीनूसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी राखीव असलेल्या पदांसाठी खेळांडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून वयोमर्यादा विहित वयोमर्यादेपेक्षा पाच वर्षे शिथिलक्षम राहील.

- **अपंगासाठीचे आरक्षण :**

१. अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा व वयोमर्यादेतील सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे. त्या संबंधीचे जिल्हा शल्यचिकित्सक किंवा केंद्र / राज्य शासनाने यासाठी स्थापन केलेली मंडळे यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२. फक्त कायम स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या उमेदवारांनाच अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचे व वयोमर्यादेतील सवलतींचे फायदे देय असतील. तात्पुरत्या स्वरुपातील अपंगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना अपंग व्यक्तींसाठी असलेले कोणतेही फायदे देय नाहीत.

३. अपंग प्रवर्गासाठी नमूद केलेले आरक्षण अंध / अल्पदृष्टी, कर्णबधीर, अस्थिव्यंग या क्रमाने अंतर्गत परिवर्तनिय असेल.

- **मागासवर्गीयांचे आरक्षण :**

१. जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम - २००० मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

२. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. आणि इ.मा.व. प्रवर्गाच्या, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूचा दावा करणा-या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्यास तसे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत कागदपत्रांच्या छाननीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा अशा उमेदवारांचा मागासवर्गाचा / अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. (आर्थिक वर्ष २०१२-१३ चे दिनांक १ एप्रिल, २०१३ नंतर सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल.)

३. उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणा-या वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. आणि इ.मा.व. प्रवर्गातील तसेच खुल्या गटातील महिला, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवारांना वयोमर्यादा, आरक्षण या सवलतींसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाही.

४. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११ नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत सादर करण्याच्या अटीवर व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून नियुक्ती दिली जाईल. नियुक्ती दिल्यावर जात पडताळणीसाठीचा प्रस्ताव हा पडताळणी समितीकडे सादर केल्याची पोहोच कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

५. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम मधील तरतुदीनुसार विमुक्ती जाती (अ), भटक्या जमाती (ब),(क),(ड) प्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनिय असेल.

- **महिलांसाठीचे आरक्षण :**

१. भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाही तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

२. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. आणि इ.मा.व. प्रवर्गाचा दावा करणा-या आणि खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवार तसेच अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्यास तसे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावे व त्याबाबतच्या नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत कागदपत्रांच्या छाननीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा अशा उमेदवारांचा आरक्षणाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. (आर्थिक वर्ष २०१२-१३ चे दिनांक १ एप्रिल, २०१३ नंतर सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल.)

- **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापनः**

१. शासनाने शासकीय विभागातील गट - अ,ब,क आणि ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५, दिनांक २८ मार्च, २००५ च्या अधिसूचनेद्वारे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहित केले आहे. या नियमांतील तरतुदींनुसार शासकीय सेवेतील पदासाठी अर्ज करतांना अर्जासोबत उमेदवाराने विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

२. प्रतिज्ञापनात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार विद्यापीठ सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येईल.

- **लेखी परीक्षा :**

जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांसाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार असल्याने लेखी परीक्षांसंदर्भातील माहिती विद्यापीठाच्या http://recruitment.unipune.ac.in या संकेतस्थळावर त्या-त्या वेळी प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे भरतीप्रक्रिया पूर्ण हाईपर्यंत कृपया उमेदवारांनी वरील संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी पाहावी.

## - परीक्षेचे स्वरुप -

### गट - 'अ' मधील सरळसेवा प्रवेशाच्या रिक्त पदांसाठी

**परीक्षेचे स्वरुप : वस्तुनिष्ठ बहुपर्यायी आणि वर्णनात्मक.**

| | | |
|---|---|---|
| एकूण पेपर | : | ०३ |
| एकूण गुण | : | ३०० |
| मुलाखत | : | १०० गुण |

**परीक्षेचे माध्यम : मराठी / इंग्रजी.**

**पेपर - १ : वस्तुनिष्ठ बहुपर्यायी : एकूण गुण १०० (ऑनलाईन परीक्षा) वेळ : १ तास.**

न्यूमॅरिकल ॲबिलिटी
सामान्य ज्ञान
रिझनिकल ॲबिलिटी
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४
शैक्षणिक प्रणाली (Educational System)

**(पेपर क्र.१ मध्ये गुणानुक्रमे उत्तीर्ण होणा-या व कागदपत्रांच्या छाननीनंतर पात्र ठरणा-या उमेदवारांमधून प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या संख्येच्या १ : ५ या प्रमाणातच गुणवत्ताधारक पात्र उमेदवार खालील पेपर क्र.२, पेपर क्र.३ व मुलाखतीसाठी पात्र ठरतील.)**

**पेपर - २ : वस्तुनिष्ठ बहुपर्यायी : एकूण गुण १०० (ऑनलाईन परीक्षा) वेळ : १ तास.**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४

विद्यापीठ परिनियम, अध्यादेश

महाराष्ट्र नागरी सेवा नियम

विद्यापीठ दैनंदिन व्यवस्थापन

विद्यापीठाचे आर्थिक व्यवस्थापन

संविधानिक व प्रशासकीय विभागप्रमुखांची कर्तव्ये व जबाबदा-या

दैनंदिन विविध कार्यालयीन कामांचे नियोजन

विद्यापीठ अनुदान आयोग

पदांच्या गरजेनुसार ज्ञानावर आधारीत

**पेपर - ३ : भाषा कौशल्य : एकूण गुण १०० वेळ : ३ तास.**

**मराठी : गुण ५०**

पत्रव्यवहार
कार्यालयीन टिपण्या
सभेची कार्यक्रम पत्रिका
इतिवृत्त
चौकशी समितीच्या नोंदी आणि टिपण
इंग्लिश उता-याचे मराठीत भाषांतर

**इंग्रजी : गुण ५०**

Letter writing
Office Notes
Agenda of the meeting
Minutes of the Meeting
Noting and Report writing of inquiry committee
Translation of Marathi passage into English

**मुलाखत : एकूण गुण - १००**

| | |
|---|---|
| इंग्लिश डिक्टेशन - | १५ गुण |
| मराठी डिक्टेशन - | १५ गुण |
| तोंडी मुलाखत - | ७० गुण |

**टिप :** पेपर क्र.२ च्या एकूण गुणांच्या ५० टक्के, पेपर क्र.३ च्या एकूण गुणांच्या २५ टक्के व मुलाखतीसाठीच्या एकूण गुणांच्या २५ टक्के भार (Weightage) अंतिम निवडीसाठी ग्राहय धरला जाईल.

**गट - 'ब': मधील सरळसेवा प्रवेशाच्या रिक्त पदांसाठी**

**परीक्षेचे स्वरुप : वस्तुनिष्ठ बहुपर्यायी, वर्णनात्मक आणि मुलाखत**

| | | |
|---|---|---|
| एकूण पेपर | : | ०२ |
| एकूण गुण | : | २०० |
| मुलाखत | : | १०० गुण |

**परीक्षेचे माध्यम : मराठी / इंग्रजी.**

**पेपर - १ : वस्तुनिष्ठ बहुपर्यायी : एकूण गुण १०० (ऑनलाईन परीक्षा) वेळ : १ तास**

न्यूमॅरिकल ॲबिलिटी
सामान्य ज्ञान
रिझनिकल ॲबिलिटी
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४
शैक्षणिक प्रणाली (Educational System)

**(पेपर क्र.१ मध्ये गुणानुक्रमे उत्तीर्ण होणा-या व कागदपत्रांच्या छाननीनंतर पात्र ठरणा-या उमेदवारांमधूनच प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या संख्येच्या १ : ५ या प्रमाणातच गुणवत्ताधारक पात्र उमेदवार खालील पेपर क्र.२ (भाग १ व भाग २) व मुलाखतीसाठी पात्र ठरतील.)**

**पेपर - २ : वस्तुनिष्ठ बहुपर्यायी, वर्णनात्मक आणि भाषा कौशल्य एकूण गुण : १००**

**भाग - १ : वस्तुनिष्ठ बहुपर्यायी : एकूण गुण ५० (ऑनलाईन परीक्षा) वेळ : ३० मिनिटे**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४
विद्यापीठ परिनियम, अध्यादेश
महाराष्ट्र नागरी सेवा नियम
विद्यापीठ अनुदान आयोग
उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य
पदांच्या गरजेनुसार ज्ञानावर आधारीत

**भाग - २ वर्णनात्मक आणि भाषा कौशल्य : एकूण गुण ५० वेळ : ९० मिनिटे**

**मराठी : गुण २५**

पत्रव्यवहार
कार्यालयीन टिपण्या
इंग्लिश उता-याचे मराठीत भाषांतर

**इंग्रजी : गुण २५**

Letter writing
Office Notes
Translation of Marathi passage into English

**मुलाखत : एकूण गुण - १००**

| | |
|---|---|
| इंग्लिश डिक्टेशन - | १० गुण |
| मराठी डिक्टेशन - | १० गुण |
| तोंडी मुलाखत - | ८० गुण |

**टिप :** पेपर क्र.२ च्या एकूण गुणांच्या ७५ टक्के व मुलाखतीसाठीच्या एकूण गुणांच्या २५ टक्के भार (Weightage) अंतिम निवडीसाठी ग्राहय धरला जाईल.

- **लेखी परीक्षेसंबंधी सूचना :**

१) गट ‘अ’ मधील पदांकरिता लेखी परीक्षेची प्रक्रिया राबवितांना पेपर क्र.१ मध्ये गुणानुक्रमे उत्तीर्ण होणा-या व कागदपत्रांच्या छाननीनंतर पात्र ठरणा-या उमेदवारांमधून प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या संख्येच्या १ : ५ या प्रमाणातच गुणवत्ताधारक पात्र उमेदवार पेपर क्र.२, पेपर क्र.३ व मुलाखतीसाठी पात्र ठरतील.

२) गट ‘ब’ मधील पदांकरिता लेखी परीक्षेची प्रक्रिया राबवितांना पेपर क्र.१ मध्ये गुणानुक्रमे उत्तीर्ण होणा-या व कागदपत्रांच्या छाननीनंतर पात्र ठरणा-या उमेदवारांमधून प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या संख्येच्या १ : ५ या प्रमाणातच गुणवत्ताधारक पात्र उमेदवार पेपर क्र.२ (भाग १ व भाग २) व मुलाखतीसाठी पात्र ठरतील.

३) गट ‘अ’ मधील पदांकरिता निवड प्रक्रिया राबवितांना पेपर क्र.२, पेपर क्र.३ आणि मुलाखतीमध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या भारांकानुसार (Weightage) प्रवर्गनिहाय अंतिम गुणवत्ता यादी तयार करुन गुणानुक्रमे पात्र ठरणा-या उमेदवारांचीच नियुक्ती करण्यात येईल. (पेपर क्र.१ चे गुण अंतिम गुणवत्ता यादीसाठी ग्राहय धरण्यात येणार नाहीत.)

४) गट 'ब' मधील पदांकरिता निवड प्रक्रिया राबवितांना पेपर क्र.२ (भाग १ व भाग २) आणि मुलाखतीमध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या भारांकानुसार (Weightage) प्रवर्गनिहाय अंतिम गुणवत्ता यादी तयार करुन गुणानुक्रमे पात्र ठरणा-या उमेदवारांचीच नियुक्ती करण्यात येईल. (पेपर क्र.१ चे गुण अंतिम गुणवत्ता यादीसाठी ग्राहय धरण्यात येणार नाहीत.)

५) निवड प्रक्रियेच्या त्या-त्या टप्प्यासाठी उमेदवारांची यादी त्या-त्या वेळी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. यासाठी विद्यापीठ कार्यालयात दुरध्वनीद्वारे / प्रत्यक्ष संपर्क साधू नये.

६) उमेदवारांची पेपर क्र.१ ची परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननी नंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित झाल्यानंतर पुढील प्रक्रियेसाठी पात्र ठरविण्यात येईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार विद्यापीठ प्रशासनाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

७) लेखी परीक्षेची प्रवेशपत्रे संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. यासाठी कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

८) गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांनुसार स्वतःची **कागदपत्रे छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांक, वेळ व ठिकाणी मूळ कागदपत्रे व छायांकीत (साक्षांकीत) प्रतीसह स्वखर्चाने स्वतः उमेदवाराने** उपस्थित राहणे आवश्यक राहील. सदर दिवशी, वेळेत व ठिकाणी उमेदवार कागदपत्रे छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास, त्याचे नांव गुणवत्ता यादीतून वगळण्यात येऊन गुणवत्ता यादीतील पुढील पात्र उमेदवारास संधी देण्यात येईल. तसेच उमेदवार भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर गैरहजर राहिल्यास अंतिम निवडीसाठी अपात्र ठरेल. याबाबत कोणतीही विनंती/तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

९) एकाच पदासाठी (Post) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७ जून, २००८ नुसार खालील प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

१. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर

२. मागसवर्गीय व मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमाती, नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती, जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती, भटक्या जमाती (धनगर व तत्सम)), इतर मागासवर्ग या क्रमाने, त्यानंतर

३. शारीरिकदृष्ट्या अपंग असलेले उमेदवार, त्यानंतर

४. माजी सैनिक असलेले उमेदवार, त्यानंतर

५. स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार, त्यानंतर

६. वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल)

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

- **इतर सूचना :**

१) अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वय ग्राहय धरण्यात येईल.

२) अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालिक, अशंकालिक, विद्यावेतन, अंशदानात्मक विनावेतन तत्वावर केलेला अंशकालिक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

३) शासनाने भरतीबाबत / नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक, आदेश इत्यादी या भरती प्रक्रियेला लागू राहतील.

४) पात्र उमेदवाराची निवड झाल्यास विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयांमधील आस्थापनांमध्ये नियुक्ती अथवा बदली करण्यात येईल.

५) अर्जदारांनी नावातील बदलाबाबत शासन राजपत्राची साक्षांकित प्रत, विशेषतः महिला उमेदवारांनी नावातील बदलाबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा शासन राजपत्राची साक्षांकित प्रत कागदपत्रांच्या छाननीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील.

६) या भरती प्रकियेसंदर्भात या कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना विद्यापीठाच्या http://recruitment.unipune.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांनी वरील संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी पाहावी. यासंबंधी विद्यापीठ कार्यालयात दूरध्वनीद्वारे / प्रत्यक्ष संपर्क साधू नये.

७) दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ नंतर शासनमान्य पदावर नियुक्ती झालेल्यांना महाराष्ट्र शासन, वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ नुसार नवीन परिभाषित अशंदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

८) अर्जदाराने अर्ज करतेवेळी शिक्षण, वय, पदासाठी असलेले आरक्षण याबाबी विचारात घेऊन प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज ऑन लाईन (Online) भरावा.

९) ज्या राखीव प्रवर्गासाठी पद आरक्षित आहे, त्याच राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी त्या पदासाठी अर्ज करावेत. (जातीच्या प्रमाणपत्राची प्रत आणि जातवैधता प्रमाणपत्राची प्रत कागदपत्रांच्या छाननीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील.) महाराष्ट्र राज्याबाहेरील रहिवासी असलेल्या मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज केल्यास ते खुल्या प्रवर्गात गणले जातील.

१०) सध्या सेवेत असणा-या उमेदवारांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व नियोक्त्याचे मूळ ना-हरकत प्रमाणपत्र व वेतनचिठ्ठी / वेतन प्रमाणपत्र कागदपत्रांच्या छाननीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील.

११) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशासन २००/प्र.क्र./२००१/३२, दिनांक २० जुलै, २००२ नुसार अनुषंगिक सुधारित शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे खाली नमूद केलेल्या पैकी एक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(अ) डी.ओ.इ.ए.सी.सी संस्थेच्या अधिकृत 'सी.सी.सी.' किंवा 'ओ' स्तर, किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

(ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र.

(क) माहिती व तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) कडील शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ अन्वये नमूद केलेल्या संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

१२) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस / मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी विद्यापीठ निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता अशा उमेदवाराची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१३) मुलाखत/नेमणूक यापैकी कोणत्याही टप्प्यावर टपालखात्याकडून उमेदवारास वेळेवर पत्र न मिळाल्यास अथवा विद्यापीठ संकेतस्थळावरील भरती प्रक्रियेसंदर्भात प्रसिध्द केलेल्या सूचना व माहितीची उमेदवाराने नोंद न घेतल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही अथवा म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

१४) जाहिरातीत नमूद केलेल्या पदांचे आरक्षण बिंदू नामावली नोंदवही तपासणीनुसार व तपासणीस अधीन राहून दर्शविण्यात आलेले आहे. बिंदू नामावली नोंदवहया फेरतपासणीअंती जाहिरातीतील पदांच्या संख्येमध्ये कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. परीक्षेचा प्रकार, पदाची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे वा रद्द करणे आणि अंशत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार विद्यापीठ प्रशासन हे स्वतःकडे ठेवत आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

१५) ज्या उमेदवारांनी त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र / सेवायोजन कार्यालय / समाजकल्याण कार्यालय / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी / जिल्हा सैनिक बोर्ड कार्यालयात नांवे नोंदविली आहेत अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणातंर्गत येणा-या उमेदवारांनी देखील पुणे विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

१६) अर्ज स्विकारणे किंवा नाकारणे याबाबत विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१७) जाहिरातीमधील नमूद पदे भरणे किंवा न भरणे याचा हक्क विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

**जाहिरात क्रमांक : १३** **(डॉ. नरेंद्र मा. कडू)**
**दिनांक : ३०/०४/२०१३** कुलसचिव